# Google Meet

**Google Ireland Limited (“Google”)**
गॉर्डन हाउस, बॅरो स्ट्रीट, डब्लिन 4, आयर्लंड
https://support.google.com/

२१ डिसेंबर २०२० पासून लागू

कराराचा सारांश

- हा करार सारांश EU कायद्यानुसार आवश्यक असलेल्या आमच्या सेवा ऑफरच्या मुख्य घटकांचे वर्णन करतो[1].
- याचा उद्देश तुम्हाला सेवा ऑफरमध्ये तुलना करण्यात मदत करण्याचा आहे.
- आमच्या सेवा ऑफरबद्दल संपूर्ण माहिती इतर दस्तऐवजांमध्ये उपलब्ध आहे.

सेवा
Google Meet वेब इंटरफेस किंवा ॲपमार्फत डिव्हाइस आणि प्लॅटफॉर्मवर ऑफर केली जाणारी व्हिडिओद्वारे संवाद साधण्याची सेवा आहे. Google Meet मार्फत संवाद साधण्यासाठी इंटरनेट कनेक्शनची आवश्यकता आहे. किमान गुणवत्तेच्या पातळीची सेवा पुरवली जात नसली तरीही Google Meet हे Google द्वारे वाजवी कौशल्य आणि काळजी घेऊन पुरवले जाते.

किंमत
Google Meet विनामूल्य आहे आणि त्याचा वापर Google सेवा अटी (https://policies.google.com/terms येथे उपलब्ध) यांच्या पालनाच्या अधीन आहे.

कालावधी, रिन्यूअल आणि समाप्त करणे
साइन अप केल्यानंतर लगेच Google Meet तुमच्या वापरासाठी उपलब्ध आहे. तुम्ही निश्चित कालावधीसाठी Google Meet वापरण्यासाठी वचनबद्ध नाही आणि हे कधीही वापरणे थांबवू शकता.

अपंगत्व असलेल्या अंतिम वापरकर्त्यांसाठी वैशिष्ट्ये
तुम्ही Google Meet मध्ये स्क्रीन रीडर आणि कीबोर्ड शॉर्टकट वापरू शकता आणि बोलत असलेल्या व्यक्तीचे कॅप्शन प्रदर्शित करू शकता. आणखी तपशील https://www.google.com/accessibility/ येथे उपलब्ध आहेत.

इतर संबंधित माहिती
गुराहक सपोर्ट: Google Meet साठी मदत / सपोर्ट https://support.google.com/ येथे उपलब्ध आहे.
विवाद: तुम्ही तुमच्या देशाच्या कायदेशीर आवश्यकतेप्रमाणे https://ec.europa.eu/consumers/odr/main/?event=main.adr.show2 येथे किंवा दुसऱ्या पुरवठादाराकडे सूचीबद्ध केलेल्या पर्यायी विवाद निराकरण पुरवठादाराकडे तक्रार नअॅदवू शकता. आणखी तपशील Google सेवा अटींमध्ये उपलब्ध आहेत.
सुरक्षा घटना: विलंब न करता सुरक्षा किंवा गोपनीयता इव्हेंट ओळखण्यासाठी आणि त्याला प्रतिसाद देण्यासाठी Google कठोर असा २४/७ घटना व्यवस्थापन प्रॉग्राम सुरू ठेवते. तुम्हाला तुमची ऑनलाइन सुरक्षा व्यवस्थापित करण्यात मदत करण्यासाठी Google एक Google सुरक्षा चेकलिस्टदेखील पुरवते.
वैयक्तिक डेटा: Google Meet वर साइन अप करण्यासाठी तुम्हाला तुमचे नाव, ईमेल आणि फोन नंबर देण्याची आवश्यकता आहे. तुम्ही Google Meet वापरता तेव्हा Google ने गोळा केलेल्या वैयक्तिक डेटाविषयी Google गोपनीयता धोरण (https://policies.google.com/privacy येथे उपलब्ध आहे) आणखी माहिती पुरवते. Google गोपनीयता धोरण तुमच्या आणि Google मधील कराराचा किंवा या सारांशाचा भाग नाही.

---

[1]युरोपियन संसदेची नियमावली (EU) २०१८/१९७२ आणि ११ डिसेंबर २०१८ रोजीची परिषद याचा अनुच्छेद १०२(३) अन्वये युरोपियन इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन्स कोड (OJ L ३२१, १७.१२.२०१८, पेज नं. ३६) स्थापन करणे.